माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील
अपील क्रमांक : २५८२/२०२४

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री. तुलसीदास गळी वासनिक, प्लाट नं. १०, शेन्डे नगर, समता शाळेसमोर, टेका नाका, पो. उप्पलवाडी, नागपूर-४४००२६	कनिष्ठ अभियंता, उद्यान विभाग, महानगर पालिका, नागपूर	उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, महानगर पालिका, नागपूर

सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६

१. उपस्थिती –

अपिलार्थी	विद्यमान जन माहिती अधिकारी	तत्कालीन जन माहिती अधिकारी	विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी	तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी
अनुपस्थित	उपस्थित	अनुपस्थित	उपस्थित	अनुपस्थित

२. व्दितीय अपील अर्ज –

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०४.१०.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०४.१०.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : आयोगाचे द्वितीय अपील क्र. ५७७/२०२४, मध्ये दिनांक १५.०३.२०२४ रोजी पारीत आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी सुनावणी घेतली नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या आदेशाची अवहेलना केलेला आहे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार संपूर्ण माहिती देण्यात यावी.

३. माहिती अर्ज –

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०२.११.२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.११.२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०२२-२३ ते २०२३-२०२४ पर्यंत

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : "(१) दयानन्द पार्क जरीपटका, नागपूर येथील उद्यानाचे कंत्राट कोणत्या एजन्सीस दिले व किती वर्षाकरीता दिले आहे, याची प्रमाणीत प्रत देण्यात यावी (२) कंत्राटदाराचे नाव व मो. क्र. सुपरवायझरचे नाव व मो. क्र., कंत्राटदाराचा कालावधी व कार्यादेश दिनांक, कामपूर्णत्वाचा दिनांक आणि कार्यादेश राशी रुपये (३) सदरहू उद्यानाचे तिकीट

दर वयस्क आणि जेष्ठ नागरीकाकरीता नियमानुसार किती आहे, याचा खुलासा (४) सदरहू उद्यानाबाबत कंत्राट माहितीचा फलक नियमाप्रमाणे उद्यानाचे दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे, याचा खुलासा करावा" इत्यादी एकूण ४ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

४. प्रथम अपील —

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०८.१२.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.१२.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०८.१२.२०२३ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तसेच आयोगाने यापुर्वी द्वितीय अपील क्र. ५७७/२०२४, मध्ये दिनांक १५.०३.२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, महानगर पालिका, नागपूर यांनी सुनावणी घेतल्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

५. युक्तीवाद/लेखी खुलासा — आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास ऐकून घेता आले नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, उद्यान विभाग, महानगर पालिका, नागपूर, श्री. संजय गुजर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उद्यान अधिक्षक, नागपूर महानगरपालिका, नागपूर, श्री. अमोल चौरपगार यांनी स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कनिष्ठ अभियंता यांच्याकडे उपलब्ध होती. तसेच ते सेवानिवृत्त झाले आहे. अतिरिक्त कार्यालयीन कामामुळे व सदर माहिती ही संकलीत करीत असल्याने सदर प्रकरणी अनावधानाने विलंब झालेला आहे. तथापि, अपिलकर्ता यांना दिनांक ०५.०६.२०२६ च्या पत्रान्वये मागितलेली एकूण ४ मुद्दयांची माहिती दिनांक १२.०६.२०२६ रोजी स्पीड पोस्टाद्वारे पाठविण्यात आली आहे.

६. निष्कर्ष :— अपिलकर्ता, श्री. तुलसीदास गळी वासनिक यांनी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, उद्यान विभाग, महानगर पालिका, नागपूर यांच्याकडे दिनांक ०२.११.२०२३ रोजी माहितीसाठी जोडपत्र-अ दाखल केला होता. त्यांच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०५.०६.२०२६ च्या पत्रान्वये मागितलेली एकूण ४ मुद्दयांची माहिती दिनांक १२.०६.२०२६ रोजी स्पीड पोस्टाद्वारे पाठविण्यात आली असल्याचे आयोगास सांगितले.

मात्र, मागितलेली माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद करीत अपिलार्थी, श्री. तुलसीदास गळी वासनिक यांनी आयोगाकडे दिनांक ०४.१०.२०२४ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. त्यांच्या या द्वितीय अपील अर्जावर आज दिनांक १५.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित केली असता, ते अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

असे असले तरीही विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी मांडलेली बाजू व आयोगासमक्ष दाखविलेले दस्ताऐवज विचारात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १५.०६.२०२६

2 JUL 2026

जावक क्रमांक ५६७७ दिनांक ----------

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर